जैन समाजाच्या राजकीय नेतृत्वाचा आणि कार्याचा अभ्यास ; विशेष संदर्भ , कोल्हापूर जिल्हा.

प्रस्तावना :

प्रभावी व्यक्ती किंवा नेतृत्व हे राजकारणाची दशा आणि दिशा ठरवत असतात हे राज्य शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. प्रत्येक मानव समूहाला त्याच्या प्रगतीसाठी सक्षम नेतृत्वाची गरज असते. त्यांची उपस्थिती आदर्श व त्यांनी केलेले मार्गदर्शन या आधारावर कोणताही समाज घटक संकटावर मात करून स्वतःची प्रगती करून घेत असतो. म्हणूनच कर्तुत्व नेतृत्वावर कोणत्याही मानव समूहाचा विकास अवलंबून असतो. तसेच नेतृत्व हे समाजाच्या मध्यवर्ती असून ते समाजाच्या समस्यांचे समाधान करणारे व मार्गदर्शक ठरणारे असते. याच करता राजकीय सामाजिक समस्यांचे आकलन होऊन त्या समस्यांचे समाधान करणारे नेतृत्वाच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

प्रत्येक समाजव्यवस्थेत आदरास पात्र ठरलेल्या काही महनीय व्यक्ती असतात. त्यांनी पार पडलेल्या अविस्मरणीय कामगिरीमुळे समाजमनावर त्यांचा अवीट ठसा उमटलेला असतो. अशा प्रभावी व्यक्तींच्या वर्तनासाठी सामाजिक शास्त्रात" नेतृत्व" हा शब्दप्रयोग वापरला जातो. राजकीय प्रक्रियांचा अभ्यास मुळातच राजकीय नेतृत्व व त्यांचे अनुयायी यांच्यातील परस्पर संबंधांच्या संदर्भाने होत असतो. तेव्हा हे संबंध कोणत्या स्वरूपाचे असतात ,त्यामागे कोणत्या सामाजिक मानसिक आणि आर्थिक शक्ती प्रेरक असतात या सर्व बाबींचे अध्ययन नेता व नेतृत्व या संकल्पने -अंतर्गत करणे आवश्यक ठरते .कारण राजकीय प्रक्रियेत केंद्रस्थानी वावरणारा वर्ग हा राजकीय नेता वर्ग म्हणून ओळखला जातो.

आधुनिक समाजव्यवस्थेत राजकीय नेतृत्वाची समस्या दिवसेंदिवस अधिक गंभीर बनत चालल्याचे दिसून येते. कारण आज राजकीय नेतृत्व विशिष्ट अशा स्तरातून निर्माण होत असताना दिसून येत नाही. त्यामुळे आपल्या इच्छेनुसार सत्ता गाजवण्याच्या बाबतीत नेत्यावर आज मर्यादा येतात. नेतृत्वास मान्यता मिळविण्याच्या दृष्टीने गुण व कर्तव्यनिष्ठा या गोष्टी अधिक महत्त्वपूर्ण ठरतात. या नेतृत्वगुणांचा अनुषंगानेच त्याच्या नेतृत्वास मान्यता मिळत असते. नेता कसा असावा, त्याचे नेतृत्व कसे असावे, आणि त्याच्या नेतृत्वास अधिमान्यता कशी प्राप्त होते. याबाबत सविस्तर चर्चा करणे उचित ठरते. भारतासारख्या विविधरंगी बहुआयामी समाजात व विकसनशील देशात नेता व नेतृत्व या संकल्पना म्हणूनच अतिशय महत्त्वपूर्ण ठरतात. कारण येथे समाजाची आणि राष्ट्राची ध्येय निश्चित करण्याची

आणि विशिष्ट काळात ती पूर्ण करण्याची जबाबदारी नेत्यांवर असते. आणि याच दृष्टीने नेतृत्वातील गुणविशेष अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. विशेषतः लोकशाही शासन व्यवस्थेत नेतृत्वाचा प्रश्न मूलगामी स्वरूपाचा समजला जातो. जनतेचा आपल्यावरील प्रचंड विश्वास आणि कार्यभार पार पाडण्याची त्यांची स्वतःची वृत्ती या गुणांच्या आधारेच आजच्या काळात नेतृत्वाची उभारणी होताना दिसते. देशातील सर्वसामान्य जनतेच्या इच्छाआकांक्षांना मूर्तस्वरूप देण्यासाठी नेतृत्वच लोकमान्य नेतृत्व म्हणून गणले जात असते .तसेच अशा प्रकारचे नेतृत्व लोकप्रिय ठरत असते.

आज नेतृत्वाची समाज मान्यता दोन बाबीवर ठरत असते. त्यातली पहिली एक म्हणजे की नेतृत्वाच्या ठिकाणी निर्णयक्षमता किती आहे, व दुसरी बाब म्हणजे घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी तो किती प्रभावीपणे करू शकतो. "दिव्यवलयांकित नेतृत्व" ही संकल्पना आज पूर्वीइतके आढळून येत नाही. त्यामुळे कार्यकुशलता या गुणाच्या आधारेच नेता व नेतृत्व आज महत्त्वाचे ठरत आहे. आणि याच संशोधनासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील जैन राजकीय नेतृत्व व कार्याचा अभ्यास हा विषय निवडून अध्ययनाचे प्रयोजन केले आहे.

विशेषतः कोल्हापूर जिल्हा ऐतिहासिक वारसा ,कृषिप्रधान व मराठा बहुल असा आहे. परंतु कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले, शिरोळ, करवीर आणि कागल या तालुक्यांमध्ये जैन समुदाय अधिक प्रमाणात पाहावयास मिळतात. या जैन समुदायाचे ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेणे इष्ट ठरते. जैन धर्म हा जगातील एक प्रमुख धर्म आहे. हा प्राचीन भारतीय धर्म असून त्याचे पुनरुज्जीवन या युगात प्रथम तीर्थंकर श्री वृषभ देवांनी केले. लोकसंख्येच्या दृष्टीने सहाव्या क्रमांकाचा हा धर्म आहे. हा धर्म अतिप्राचीन बोल लोकशाही विचार मूल्य असलेला महत्त्वाचा धर्म आहे. या धर्माने स्वातंत्र्य समता आणि न्याय या विचारांचा पुरस्कार केलेला आहे. "जगा आणि जगू द्या" या विचारांवर जैन धर्मातील तत्वज्ञान आधारलेले आहे अनेकांत वाद हा जैन धर्मातील महत्त्वाचा विचार जो मानवी कल्याणाचा पुरस्कार करतो. मानवतेसाठी सतत जागरूक राहून कार्य करण्याचे अभिवचन या अनेक अनेकांत वादातून दिले गेलेले आहे. जैन धर्माचे अत्यंत सोप्या भाषेत विश्लेषण महाविर तिर्थांकर यांनी केले. या धर्माला काही काळ राजाश्रय देखील मिळाला. जैन साहित्यानुसार या काळात जगात 62 संप्रदाय उदयास आले. चीनमध्ये कन्फ्यूशियस तर इराणमध्ये पारशी धर्म संप्रदाय उदयास आली. याच काळात बौद्ध व जैन धर्म उदयास आले. जैन धर्माचे 24 तीर्थंकर होऊन गेले. प्रथम श्री आदिनाथ भगवान व अंतिम श्री महावीर भगवान.

जैन धर्माचे तत्वज्ञान सामान्यतः जीव, अजीव ,पाप-पुण्य, ज्ञान, स्यादवाद अशा विविध तत्त्वातून मांडलेले आहे. त्याचप्रमाणे जैन धर्मामध्ये सत्य ,अहिंसा अस्तेय ,अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही पंचमहाभूते अतिशय महत्त्वाची आहेत. जैन धर्मामध्ये प्रामुख्याने दिगंबर व श्वेतांबर दोन पंथ आहेत. जातीधर्म कर्म वादाला महत्त्व देणारा आहे. भारतातील चारवाक लोकायत दर्शन शिवाय सर्व दर्शनांनी कर्म वादाचा पुरस्कार केलेला आहे. "जसे कर्म तसे फळ" या कर्मा वादाचा स्वीकार तर सर्वच धर्मानी केला आहे पण जैन धर्माने जितके सूक्ष्म रीतीने विचार व विस्तार केला आहे तशी चर्चा इतर कोणीही केलेली नाही. भगवान महावीरांच्या वेळी पूर्वेकडील देशांमध्ये जैन धर्माचा पुरस्कार झालेला होता. पण नंतरच्या शतकात जैन धर्माचा गुरुत्व केंद्र पश्चिमेकडे सरकत गेला. काही काळ तो गुजरातचा राज्य धर्म बनला नंतर बिहार कडून कर्नाटक व महाराष्ट्र या भागांमध्ये जैन धर्माचा प्रसार झाला. त्यामुळे दक्षिण भारतामध्ये दिगंबर पंथीय जैन धर्मियांची संख्या इतर प्रांतापेक्षाअधिक आहे.

संपूर्ण भारतामध्ये जैन लोकसंख्या 9,451,753 म्हणजे 0.40% इतकी एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रामधील जैनधर्मीय लोकसंख्या 1,400, 349 इतकी आहे. कोल्हापूर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 3,876,001 इतकी असून त्यामधील जैनधर्मीय लोकसंख्या केवळ 1,54,882 इतकी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येपैकी केवळ चार टक्के लोक जैनधर्मीय आहेत. लोकसंख्येचा आकार व लोकसंख्येची घनता व आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा घटक आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण लोकसंख्येमध्ये लोक हिंदूधर्मीय आहेत .68.27% लोक ग्रामीण भागात तर 31.73% लोक शहरी भागात राहतात. एकूण लोकसंख्येपैकी जैनधर्मीय लोकसंख्या केवळ 4% आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये एकूण 1212 खेडी व १२ तालुके आहेत. तर शहरी विभागात 13 नगरपालिका 2 नगरपंचायत व 1 कोल्हापूर महानगरपालिका आहे. जैन धर्मियांची सर्वाधिक लोकसंख्या हातकणंगले ,शिरोळ ,कागल व करवीर या तालुक्यामध्ये आढळते. हातकणंगले तालुक्यातील विशेषता पुढील गावांमध्ये जैन धर्मीय लोकसंख्या अधिक आढळते.

हेरले- 70%   हातकणंगले - 40%.   कुंभोज- 65%

कोरोची- 30%.   रुई- 60%

त्याचप्रमाणे शिरोळ तालुक्यातील पुढील गावांमध्ये जैनधर्मीय लोकसंख्या अधिक आढळते.

कोथळी- 60 % शिरटी – 60% नांदणी -55 %

अकिवाट -65%. हसूर -50% उदगाव -30%

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की जैन समाज हा अल्पसंख्यांक आहे.कोल्हापूर सारख्या मराठा बहुसंख्यांक भागांमध्ये असून सुद्धा जैन समाजातील नेतृत्वाने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. या नेतृत्वाच्या पुढाकाराने राजकीय सामाजिक आर्थिक शैक्षणिक व सांस्कृतिक घटकांमध्ये विकासाचे अनेक त्या रूपे रागवलेली आहेत म्हणूनच कोल्हापूर जिल्हयातील जैन नेतृत्वाचा अभ्यास व विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंध आधारे करण्यात आला आहे.

विषय निवड

सध्याच्या काळात सक्षम नेतृत्व आवश्यक असून नेतृत्वाची आजची आवश्यकता काय आहे ,या नेतृत्वाचा उदय कसा झालेला आहे, आणि त्याला घराण्याची राजकीय पार्श्वभूमी लाभलेली आहे का, अशा सर्व कारणांचा शोध घेणे व त्याचा अभ्यास करणे भारताच्या लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने गरजेचे आहे. कोणत्याही नेतृत्वाचा विकास हा स्थानिक पातळीपासून होत असतो. कारण त्या नेतृत्वाला गती ही त्याच्या कार्यामुळेच प्राप्त होत असते. कारण नेतृत्व जोवर सिद्ध होत नाही तोवर त्याला मान्यता प्राप्त होऊन तिचा विकास शक्य नाही. मूल्यांची झालेली घसरण भ्रष्टाचार राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण या पार्श्वभूमीवर राजकीय व सामाजिक बदलासाठी नेतृत्व गुणांची आवश्यकता निश्चित जाणवते.

प्रस्तुत शोधनिबंधात कोल्हापूर जिल्हयातील जैन राजकीय नेतृत्वाचा राजकीय अभ्यासातून संबंधित क्षेत्रात मधील या समाजाचा विकासात्मक योगदानाचा अभ्यास करणे यथोचित वाटते. संख्येने अल्पसंख्यांक असून देखील स्थानिक स्वराज्यासंस्थेबरोबरच विधिमंडळ व संसद या मध्ये देखील असल्याने त्याने उत्तम कामगिरी केली आहे. श्री कल्लाप्पांना आवाडे यांचे राजकीय ,सामाजिक विशेषतः सहकार क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. गेल्या पन्नास वर्षापासून स्थानिक स्वराज्य संस्था विविध सहकारी संस्था आणि त्याचबरोबर विधानसभा आणि लोकसभा यामधील खूप प्रगल्भ असा अनुभव कल्लाप्पांना आवाडे यांना आहे. आज त्यांचे पुत्र त्यांच्या स्नुषा व त्यांचे नातू अशी सर्व मंडळी राजकारणात सक्रिय आहेत. असे दिसते की ते केवळ स्वतः नेतृत्व करून थांबले नाहीत ; तर त्यांनी नव्या नेतृत्वाची उभारणी देखील करून दाखवली आहे.

घराण्याचा राजकीय वारसा घेऊन श्री प्रकाश आवाडे यांनी देखील 1985 -1990 आणि सध्या 2019-2024 मध्ये विधानसभेचा कार्यभार आमदार म्हणून पार पडत आहेत. याच बरोबर शेतकरी चळवळीची धुरा सांभाळत शिवार ते संसद असा खडतर प्रवास जाणे अतिशय जोमाने पार पडला असे माननीय श्री राजू शेट्टी यांच्या कार्याचा अभ्यास करण्याचे योजले आहे. राजू शेट्टी 2004 ते 2009 विधानसभा सदस्य तर 2009 ते 2019 सलग दोन वेळा लोकसभा सदस्य म्हणून कार्यरत होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य राजू शेट्टी यांनी केलेले आहेत. सलग पंधरा वर्षाचा राजकीय कार्याचा उदंड अनुभव त्यांच्यापाशी आहे. त्याचबरोबर त्यांनी सामाजिक क्षेत्रांमध्ये देखील भरपूर कामगिरी केलेली आहे. जैन नेतृत्वाचा विकास सातत्याने होत आहे आणि या विकासात महत्त्वपूर्ण मोलाची भर म्हणजे श्री राजेंद्र

पाटील-यड्रावकर होय. 2019 ते 2024 महाराष्ट्र राज्य आरोग्यमंत्री म्हणून ते कार्यभार पाहत आहेत. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी देखील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये बरीच विकासाची कामे राबवलेली आहेत.

कोल्हापूर सारख्या मराठा बहुभाषिक भागात असून देखील जैन नेतृत्वाने आपल्या कार्यातून विविध विकासाचे प्रारूप राबवलेले आहे. सदर कार्यावर प्रकाश टाकण्यासाठी संशोधन विषय म्हणून हा विषय नियोजित करण्यात आलेला आहे.

संशोधनाचा पूर्व अभ्यास

कोणत्याही संशोधन प्रकल्पांमध्ये अथवा प्रबंध लेखनामध्ये पूर्व अभ्यासाचा आढावा घेणे अगत्याचे ठरते. त्यामुळे अभ्यासाची दिशा व स्वरूप सुनिश्चित होऊन त्याला अधिक धारदार पणा येण्यास मदत होते.

१) जीन ब्लांडेल यांचा पोलिटिकल लीडरशिप जनरल एनालिसिस 1987 हा राजकीय नेतृत्व संबंधीचा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. यामध्ये राजकीय नेतृत्वाची संकल्पना ,वैशिष्ट्ये त्यांच्या भूमिका याबद्दल महत्त्वपूर्ण चर्चा केलेली दिसते. तसेच यामध्ये व्यक्तिगत गुणवैशिष्ट्ये व संस्थापक पैलूंच्या नेतृत्वावर असलेल्या प्रभावाचा सविस्तर अभ्यास करून नेतृत्वाची विविध गुणवैशिष्ट्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

२) एल .पी .विद्यार्थी यांनी संपादित केलेल्या लीडरशिप इन इंडिया 1987 मौलिक ग्रंथामध्ये विविध मान्यवरांचे लेख समाविष्ट केले आहेत. नेतृत्वाबाबत च्या मूलभूत सैद्धांतिक आयामांची व अभ्यास पद्धती ची विस्तृत चर्चा यामध्ये करण्यात आली आहे.

३) पवार प्रकाश ,भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, प्रकाशन -पुणे, 2014.

उपरोक्त संदर्भ ग्रंथामध्ये लेखक प्रकाश पवार यांनी भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून नेतृत्व घडत जाते ,त्यामुळे नेतृत्वाला सामाजिक अर्थ असतो तेथे जात धर्म भाषा वंश हे मुद्दे नेतृत्व निश्चित करतात असे सांगितले आहे. भारतातील काळानुसार नेतृत्वाच्या विविध प्रारूपाची चर्चा करण्यात आलेली आहे .पंडित नेहरू न्यायमूर्ती रानडे महात्मा गांधी विद्या सावरकर यांच्या नेतृत्वाची मांडणी केली आहे. या संदर्भ ग्रंथांच्या माध्यमातून सामूहिक नेतृत्व म्हणजे आपण हुकूमशहा नाही अशी भूमिका मांडताना दिसते. सामूहिक नेतृत्वाची संकल्पना लोकशाही विचारांशी सुसंगत अशी भूमिका घेणारी

असते. काळात सामूहिक नेतृत्व ही संकल्पना लागू होणारी आहे तर हुकूमशाही नेतृत्व ही संकल्पना सातत्याने नाकारली गेली आहे याचाही आढावा यामध्ये घेतला आहे.

४) राम कांडगे,"लोकनेते शरद", राजश्री, पुणे 2010.

उपरोक्त संदर्भ ग्रंथात शरद पवार यांच्या जन्म व बालपणापासून ते त्यांच्या आत्तापर्यंतच्या जीवन प्रवास मांडला आहे. लेखकाने शरद पवार यांची नेतृत्व क्षमता याबद्दल व त्यांचा राजकारणातील प्रवेश याविषयी विश्लेषण केले आहे. शरद पवार यांनी राजकारणात घेतलेले निर्णय, निर्णयांचा परिणाम तसेच त्यांच्या निर्णय मागील कारणांचा शोध घेतला आहे. एकूणच शरद पवारांच्या राजकीय कारकिर्दीचा व त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा या ग्रंथात घेतला आहे.

५) जनार्दन काशिनाथ खंडागळे यांच्या बाळासाहेब विखे पाटील; ग्रामीण नेतृत्व एक अभ्यास ,या शोधप्रबंध आत बाळासाहेब विखे पाटील यांची ग्रामविकास विषयक 2004 टाकलेला आहे भूमिका आणि राजकीय सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यावर प्रकाश.

६) डॉ. सुहास पळशीकर व नितीन बिर्मल यांच्या ,,"महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ "2004 या पुस्तकांमध्ये महाराष्ट्राच्या सद्यस्थितीतील राजकारण व स्थानिक नेतृत्व यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

७) प्रा. सौदागर फय्याज मुनीर साब, यांनी "महाराष्ट्रातील मुस्लीम नेतृत्वाचा विधानसभेतील सहभाग व कामगिरी"_एक चिकित्सक अभ्यास. 2004 ते 2009. या प्रबंधात आकडेवारीच्या आधारे विधानसभेतील नेतृत्वाचा सहभाग व कामगिरी यांचे विश्लेषण केलेले आहे

८) प्रा. उत्तम सावंत यांनी "शंकरराव चव्हाण जीवन कार्य" या अभ्यासात शंकरराव चव्हाण यांच्या शैक्षणिक व राजकीय कार्याचा आढावा घेतलेला आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

सदर संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्र राज्याच्या कोल्हापूर जिल्हयातील जैन राजकीय नेतृत्व या अध्ययनाशी संबंधित आहे. सदर संशोधनामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अभ्यासासाठी 2007 ते 2022 हा कालखंड घेतलेला आहे .बाकी विधानसभा व लोकसभा यासाठी केवळ ज्या जैन नेतृत्वाने नेतृत्व

केले आहे त्यांचा समावेश प्रस्तुत संशोधनामध्ये करण्याचे योजिले आहे. संशोधन विषय राजकीय असला तरी चरित्रात्मक भाग काही प्रमाणामध्ये अपरिहार्य राहील.

प्रस्तुत संशोधनात संशोधनाची व्यापकता व तथ्य संकलनात येणाऱ्या संभाव्य समस्या टाळण्यासाठी संशोधकाने केवळ कोल्हापूर जिल्ह्याची निवड केली आहे. संशोधनामध्ये ठरलेल्या सर्व मर्यादेच्या अधीन राहूनच संशोधन पूर्ण केले जाईल हीच खरी व्याप्ती व मर्यादा आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१) कोल्हापूर जिल्ह्यातील जैन समाजाच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे अध्ययन करणे.

२) कोल्हापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील जैन नेतृत्व मधील राजकीय सत्ता व विकास यांच्या अंतर संबंधाचा अभ्यास करणे.

३) कोल्हापूर जिल्ह्यातील विधानसभा मधील जैन नेतृत्वातील राजकीय सत्ता व विकास यांच्या अंतर संबंधाचा अभ्यास करणे.

४) कोल्हापूर जिल्ह्यातील लोकसभेतील जैन नेतृत्व मधील राजकीय सत्ता व विकास यांच्या अंतर संबंधाचा अभ्यास करणे.

५) जैन समाजाच्या समकालीन राजकीय प्रवाहांचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके

१) कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये जैन समुदायाचा राजकीय सहभाग आहे

२) बहुसंख्यांक मराठा व बहुजन समाजाच्या भागातसुद्धा जैन नेतृत्वाने स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे

३) कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकीय विकासाबरोबर सामाजिक, कृषी, शैक्षणिक ,औद्योगिक, सहकारी क्षेत्राचा विकास जैन नेतृत्वातून झालेला आहे.

४) जैन नेतृत्व बहुसंख्यांक सर्व धर्मीय सर्वसामान्य जनतेच्या पाठिंब्यातून तयार झालेले आहे.

५) जैन नेतृत्वाचा विकास काही विशिष्ट भागात झालेला आहे

६) जैन नेतृत्वाचा विकासाच्या योगदानातून सदर परिसरात रोजगाराची निर्मिती झालेली आहे.

संशोधन पद्धती

सदर संशोधनासाठी महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हा हे कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. हे संशोधन तथ्य संकलनासाठी केले असून ते अनुभवाधिष्ठित तथ्य आहे. यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग केलेला आहे.

प्रस्तुत अभ्यास हा वर्णनात्मक- विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. यामध्ये माहिती संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्रोतांचा वापर केला जाणार आहे.

प्राथमिक स्त्रोत

१) प्रश्नावली- संशोधन कार्यामध्ये ते तथ्य संकलनासाठी प्रश्नावली चा वापर करण्यात येईल. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभागी सदस्य व नेतृत्व तसेच कार्यक्षेत्रातील प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेशी निगडित निवडक व्यक्तींच्या प्रश्नावली द्वारे माहितीचे संकलन करण्यात येईल

२) मुलाखत- प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करिता विधानसभा व लोकसभेचे नेतृत्व केलेल्या श्री कल्लाप्पांना आवाडे, प्रकाश आवाडे ,राजू शेट्टी ,राजेंद्र पाटीलयड्रावकर-, यांच्या तसेच कार्यक्षेत्रातील राजकीय प्रक्रियेशी निगडित व इतर संलग्न असलेल्या निवडक व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात येतील.

३) क्षेत्रीय अभ्यास- कोल्हापूर जिल्ह्याच्या प्रत्यक्ष कार्य क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा व लोकसभा मतदारसंघ यामधील घटकांचा अभ्यास करण्याचे योजले आहे.

४) निरीक्षण- कोल्हापूर जिल्ह्यातील या नेतृत्वाचा अभ्यास करताना निरीक्षण तंत्राचा उपयोग केला जाईल या कार्यक्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, पक्षीय कार्यालय, सार्वजनिक निवासस्थान ,निवडक सहकारी सोसायटी ,शिक्षण संस्था, सहकारी साखर कारखाने, इत्यादी ठिकाणी भेट देऊन प्रत्यक्ष राजकीय कार्याचे निरीक्षण करून विषयाशी निगडित आवश्यक माहिती प्राप्त करण्याचे योजले आहे.

५) भारत सरकार,महाराष्ट्र शासन ,यांची परिपत्रके, दस्तऐवज.

दुय्यम स्त्रोत

१) संदर्भ ग्रंथ

२) मासिके

३) वृत्तपत्रे

४) संबंधित राजकीय नेतृत्वाशी निगडित प्रकाशित असलेले साहित्य.

५) प्रसारमाध्यमांकडून मिळणारी माहिती.

६) विविध ऐतिहासिक दस्तऐवज.

७) सहकारी कारखान्यांच्या च्या वार्षिक अहवाल पत्रिका.

८) इंटरनेट

प्रकरण योजना

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रस्तावना, संशोधन विधान, संशोधन महत्त्व, पूर्व संशोधनाचा आढावा, संशोधन व्याप्ती व मर्यादा, उद्दिष्टे, गृहितके, संशोधन पद्धती, तथ्य संकलन पद्धती, नियोजित प्रकरण विभाग, संदर्भ ग्रंथ.

प्रकरण दुसरे

अ) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील जैन नेतृत्व व कार्य

कोल्हापूर जिल्ह्यामधील ग्रामपंचायत पंचायत समिती व जिल्हा परिषद यामध्ये असलेल्या जैन नेतृत्वाचा अभ्यास . विकासात्मक कार्याचा आढावा.

ब) शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जैन नेतृत्व व कार्य

कोल्हापूर जिल्ह्यामधील नगरपालिका व महानगरपालिका यामध्ये असलेल्या जैन नेतृत्वाचा अभ्यास. त्यांनी केलेल्या विकासात्मक कार्याचा आढावा.

प्रकरण तिसरे

कोल्हापूर जिल्ह्यातील जैन नेतृत्वाचे विधानसभेतील कार्य

कोल्हापूर जिल्ह्यामधील विकासात्मक नेतृत्वाची सुरुवात श्री कल्लाप्पांना आवाडे यांचे निवडीतून त्यानंतर त्यांचाच वारसा घेऊन श्री प्रकाश आवाडे यांच्या नेतृत्त्वाचा व कार्याचा आढावा. शेतकरी चळवळीच्या आंदोलनातून तयार झालेल्या श्री राजू शेट्टी यांच्या विधानसभेतील नेतृत्वतून केलेल्या कार्याचा अभ्यास. सध्या कार्यरत असलेल्या राज्य आरोग्य मंत्री श्री राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्या राजकीय कार्याचा आढावा.

प्रकरण चौथे

कोल्हापूर जिल्ह्यातील जैन नेतृत्वाचे लोकसभेतील कार्य

आपल्या यशस्वी व विकासात्मक कार्याच्या आधारे लोकसभेत निवडून आलेल्या श्री कल्लाप्पांना आवाडे श्री राजू शेट्टी यांच्या कार्याचा अभ्यास.

प्रकरण पाचवे

सहकार, सामाजिक, व इतर क्षेत्रातील जैन नेतृत्वाचे कार्य.

कोल्हापूर जिल्ह्यातील नेतृत्व केवळ राजकीय क्षेत्रात पुरते मर्यादित न राहता या भागातील सहकारी क्षेत्रात उदाहरणार्थ सहकारी साखर कारखाने, सहकारी सुत गिरणी, सहकारी पतसंस्था, सहकारी दुग्ध संस्था, शैक्षणिक संस्था, औद्योगिक क्षेत्रातील विविध कारखाने. इत्यादी बहुविध क्षेत्रातून समाजासाठी केलेल्या योगदानाचा आढावा.

प्रकरण सहावे

निष्कर्ष, उपसंहार, शिफारसी..

संदर्भसूची

१)कोळंबे रंजन, 2014, भारताची राज्यघटना आणि प्रशासन, भगीरथ प्रकाशन.

२) खंडागळे जनार्दन, 2004, बाळासाहेब विखे पाटील; ग्रामीण नेतृत्व एक अभ्यास. पीएचडी प्रबंध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.

३) खेकाळे ना.रा. 1999, राजकीय नेतृत्व, नागपूर, मंगेश प्रकाशन.

४) सावंत के. बी. 2000, शंकरराव चव्हाण; जीवन व कार्य, नांदेड, निर्मल प्रकाशन.

५) फडके य. दी. 1989, विसाव्या शतकातील महाराष्ट्र-खंड दोन, पुणे, विद्या प्रकाशन.

६) पळशीकर सुहास व बिर्मल नितीन ,2004 महाराष्ट्राचे राजकारण; राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, पुणे, प्रतिभा प्रकाशन.

७) सौदागर फय्याज मुनीर साब; महाराष्ट्रातील मुस्लीम नेतृत्वाचा विधानसभेतील सहभाग व कामगिरी एक चिकित्सक अभ्यास, 2004 -2009, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

८) www.zp kolhapur.gov.in

९) Google

संशोधक विद्यार्थी
रेखा श्रीपाल कागे
(M.A, B.ed ,Pol. Science)
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

संशोधक मार्गदर्शक
प्रा. डॉ. एस. एम. लेंडवे
(M.A, M.Phil, Ph.D, Pol. Science)
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शिवाजी कॉलेज रेणापूर